सगळेच आपल्यासाठी टाळ्या
वाजवणार नाहीत...
तर काहीजण आपल्याला बोटही दाखवतील
हे देखील स्वीकारावं लागेल.
क्योकी, "जब तक है जिंदा
तब तक है निंदा."

दैनिक **अक्षराज**
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३२७
पाने : ०६, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०८ जुलै २०२५


# पटक पटक के मारेंगे! राज ठाकरेंना थेट आव्हान...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०७, मुंबई :** मराठी भाषा न बोलणाऱ्या अमराठी दुकानदाराला महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी चोप दिल्याची घटना गेल्याच आठवड्यात घेतली. त्याचा उल्लेख मनसे प्रमुख राज ठाकरेंनी शनिवारी झालेल्या विजयी मेळाव्यात केला. मराठी बोलणार नाही, असं कोणी उर्मटपणे म्हणत असेल तर त्याला चोपा, पण व्हिडीओ काढू नका, असा सल्ला राज यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांना दिला. त्यावरुन भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी राज ठाकरेंवर कडाडून टीका केली आहे.



राज ठाकरे आणि उद्धव ठाकरेंची शिवसेना महापालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेवून राजकारण करत आहे. त्यांच्याच हिंमत असेल तर त्यांनी बिहार, उत्तर प्रदेश किंवा तमिळनाडूत यावं. त्यांना आपटून आपटून मारु, असं वादग्रस्त विधान दुबे यांनी केलं. 'मराठी बोलावं लागेल, असं ते म्हणतात. तुम्ही कोणाची भाकर खात आहात? तिथे टाटा, बिर्ला, रिलायन्स आहे. महाराष्ट्रात एकही युनिट नाही. टाटांनी पहिला कारखाना बिहारमध्ये सुरु केला. तुम्ही आमच्या पैशांवर जगताय. तुमच्याकडे कोणते उद्योग आहेत? खाणी आमच्याकडे आहेत, झारखंड, छत्तीसगड, मध्य प्रदेश, ओडिशात खाणी आहेत. तुमच्याकडे कोणत्या खाणी आहेत,' असा सवाल दुबेंनी विचारला.

निशिकांत दुबे झारखंडच्या गोड्डा मतदारसंघाचे खासदार आहेत. २००९ पासून ते गोड्डा मतदारसंघाचं लोकसभेत प्रतिनिधीत्व करतात. २००९ मध्ये त्यांनी काँग्रेस उमेदवाराचा ६० हजार मतांनी पराभव केला. यानंतर २०१४, २०१९ आणि २०२४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकांमध्ये ते लाखापेक्षा अधिक मताधिक्क्यानं निवडून आले. दुबे यांचे वडील डाव्या विचारांचे होते. पण दुबे उजव्या विचारसरणीचे आहेत. अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतून ते भाजपमध्ये सक्रिय झाले.

निशिकांत दुबे यांनी सुरुवातीला भाजपचे वरिष्ठ नेते अरुण जेटली, गोविंदाचार्यांसोबत काम केलं. दुबे यांच्याविरोधात ९ गुन्ह्यांची नोंद आहे. तशी माहिती त्यांनी शपथपत्रात दिलेली आहे. झारखंडमध्ये कॉलेज जमीन हडपल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. एका उद्योजकाकडे २ कोटी रुपये मागितल्याची आरोप दुबे दाम्पत्यावर आहे.

वादग्रस्त आणि बेताल विधानांमुळे ते चर्चेत असतात. एप्रिलमध्ये त्यांनी तत्कालीन सरन्यायाधीशांविरुद्ध विधान केलं. देशभर होणाऱ्या गृहयुद्धांना सरन्यायाधीश संजीव खन्ना जबाबदार असल्याचं दुबे म्हणाले होते. तुम्ही निवडणूक आयुक्त नव्हे, तर मुस्लिम आयुक्त होतात. झारखंडमध्ये तुमच्या काळातच बांग्लादेशी घुसखोर मतदार बनले, असं वादग्रस्त विधान दुबे यांनी केलं होतं.

# राज्यातील वाढत्या गुन्हेगारीमुळे कुशल सरकारी वकिलांची आवश्यकता

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०७, खडकवासला (पुणे) :** राज्यात १०१७ पब्लिक प्रॉसिक्यूटर्स काम करत आहेत. नवीन क्रिमिनल कायदा लागू झाला आहे. गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असून यामुळे न्यायदान यंत्रणेवर मोठा भार पडतो आहे. त्यामुळे कुशल सरकारी वकिलांची आज आवश्यकता आहे. न्यायदान यंत्रणेतील सरकारी वकील (प्रॉसिक्यूटर) अविभाज्य भाग आहेत. ते न्यायदानाच्या इतर घटकांबरोबर समन्वयाने चालले, तरच संपूर्ण व्यवस्था नीट चालेल, असे मत राज्याच्या अभियोजन संचालनालयाचे संचालक अशोककुमार भिलारे यांनी व्यक्त केले.



नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या वतीने सरकारी वकील होण्याकरिता परीक्षा तयारी, प्रशिक्षण आणि संशोधनासाठी केंद्राचे उद्घाटन कोरेगाव पार्क येथील हॉटेल ओ मध्ये आयोजित कार्यक्रमात झाले. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर, एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी चे कुलगुरू डॉ. आर.एम. चिटणीस, इन्स्टिट्यूट्सचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर, खजिनदार सुरेखा जाधवर, डॉ. सपना देव आदी उपस्थित होते. कार्यक्रमात याविषयीच्या माहिती पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात आले.

यावेळी अभियोजन संचालनालयाच्या पुणे विभागाच्या उपसंचालक रश्मी नरवाडकर, कोल्हापुरच्या सहाय्यक संचालक ममता पाटील, पुण्याच्या सहाय्यक संचालक सुप्रिया मोरे देसाई, सातार्याच्या सहाय्यक संचालक वैष्णवी पाटील, सोलापुरचे सहाय्यक संचालक आनंद नारखेडकर, अहिल्यानगरच्या सहाय्यक संचालक संगीता ढगे आदी मान्यवर देखील उपस्थित होते, त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. सरकारी वकील होण्याच्या दृष्टीने आवश्यक बाबींविषयी व प्रशिक्षणाच्या विषयावर सर्व मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

अशोककुमार भिलारे म्हणाले, योग्य न्यायासाठी सरकारी पक्षाने स्वतःची बाजू व्यवस्थित मांडली पाहिजे. जर असे घडले, तरच लोकांना न्याय मिळू शकेल. साक्षीदारांशी संवेदनशीलतेने वागणे गरजेचे आहे. न्याय मिळवण्यासाठी साक्षीदार हा महत्वाचा दुवा आहे आणि त्यांच्याशी सहवेदना व समजुतीने वागणे आवश्यक आहे. सरकारी वकील होण्याकरीता पहिल्यांदाच हे सेंटर सुरू होते आहे. सरकारी वकिलांना कामकाज करताना पायाभूत सोईसुविधांचा मोठ्या प्रमाणात अभाव भासतो. न्यायालयात काम करताना त्यांना स्वतंत्र कक्ष नाही, या संदर्भात मी उच्च न्यायालयाला लिहीणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

डॉ. पराग काळकर म्हणाले, न्यायप्रक्रियेत सरकारी वकीलांची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे आणि त्यांच्यावर मोठी जबाबदारी असते. सरकारी बाजू मांडणाऱ्या वकिलांच्या कामाकडे माध्यमांचे आणि सामान्य जनतेचे विशेष लक्ष असते. कारण ते सर्वसामान्यांचे प्रतिनिधी म्हणून न्यायालयात उभे असतात. त्यामुळे, हा नाविन्यपूर्ण अभ्यासक्रम निश्चितच सरकारी वकील होण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी उपयुक्त ठरेल.

डॉ. आर.एम. चिटणीस म्हणाले, सरकारी वकील होणे म्हणजे केवळ एक नोकरी नव्हे, तर ती एक मोठी जबाबदारी आहे. कायद्याचे राज्य प्रस्थापित करणे आणि न्याय नीतीमत्तेने होणे ही त्यामागची भूमिका आहे. कोणतीही कायदेशीर त्रुटी राहू न देता खटल्याची पूर्तता करणे. पुराव्यांचे परीक्षण, चौकशी अपुरी असल्यास त्याचा सल्ला देणे, हे सर्व त्यांच्या निपुणतेवर अवलंबून असते. राज्य सरकार नागरिकांच्या हक्कांचे रक्षण करत असते आणि सरकारी वकील हे त्या प्रक्रियेचा एक महत्त्वाचा भाग आहेत. सरकारी वकील हे जनतेचे संरक्षक असतात. या प्रशिक्षण केंद्रामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना सार्वजनिक अभियोक्ता बनण्याच्या दृष्टीने व्यावहारिक प्रशिक्षण मिळणार आहे. ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, संपूर्ण भारतात प्रथमच सर्व सरकारी वकिलांसाठी आयोजित करण्यात आलेला हा एकमेव कार्यक्रम असेल. सरकारी वकिलांकडून समाजाच्या खालच्या स्तरात राहणाऱ्या वाड्या, वस्त्या, तांड्यावरील गरिब, वंचित लोकांसाठी न्याय मिळवण्याची अपेक्षा असते. परंतु, आजही 'पब्लिक प्रॉसिक्यूटर' होण्याचे स्वप्न कोणी बघत नाही. ही परिस्थिती बदलण्यासाठी, सरकारी वकील घडवण्याचे शिवधनुष्य आम्ही उचलले आहे. आदर्श सरकारी वकील तयार करण्यासाठी या सेंटरची स्थापना करण्यात आली आहे. पुणे विद्यापीठ मान्यताप्राप्त सर्टिफिकेट कोर्स राबवण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# धनोजे कुणबी समाज मंदिर, चंद्रपूर येथे गुणवंतांचा सत्कार ! 'यशाची गुरुकिल्ली' पुरवणीचे प्रकाशन

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०७, चंद्रपूर :** धनोजे कुणबी समाज मंदिर लक्ष्मीनगर चंद्रपूर तर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही नुकताच विद्यार्थी, शेतकरी, पीएचडीधारक तसेच इतर क्षेत्रात गुणवंत ठरलेल्या समाजबांधवांचा सत्कार सोहळा नुकताच कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड . पुरुषोत्तम सातपुते यांच्या उपस्थितीत पार पडला.

कार्यक्रमाचे उद्घाटक चांदा शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्ष डॉ. प्रतिभा अशोक जीवतोडे तर मुख्य अतिथी उद्योजक संजय ढवस, सुलोचना बल्की तसेच मुख्य मार्गदर्शक एनडीए प्रशिक्षित प्रद्युमन गुरव, प्रा डॉ. मनीष मत्ते, कौन्सिलर निर्वेध सुटे उपस्थित होते. अतिथींमध्ये मंडळाचे सल्लागार मनोहर पाऊणकर, मंडळाचे सचिव अतुल देऊळकर, उपाध्यक्ष विनोद पिंपळशेंडे, कोषाध्यक्ष अरुण मालेकर, सदस्य महेश खंगार डॉ. मीना माथनकर, भाऊराव झाडे उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी डॉ. प्रतिभा जीवतोडे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना सुसंस्कृत करणे ज्याप्रमाणे शिक्षकांचे कर्तव्य असते त्याचप्रमाणे पालकांनीही विद्यार्थ्यांच्या संस्काराकडे लक्ष द्यावे, त्यासाठी त्यांनी विविध यशस्वींचे उदाहरणे देऊन स्पष्ट केले. मुख्य मार्गदर्शनात गुरव यांनी एनडीए संदर्भातील अभ्यासक्रम प्रशिक्षण व परीक्षा आदी संदर्भात मार्गदर्शन तर प्रा.डॉ.मत्ते यांनी कला व विज्ञान शाखांमधील विद्यार्थ्यांनी स्वबळावर करिअरच्या वाटा शोधाव्या व स्वतः आवडीनुसार करिअर करावे. जेणेकरून भविष्यात चिंता करण्याची गरज नसल्याचे मत मांडले. सुटे यांनी विदेशातील शिक्षण व सोयीसुविधा यावर प्रकाश टाकला तर संजय ढवस यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी उद्योजक बनण्याचा सल्ला दिला. याशिवाय मंडळाला आर्थिक मदत करण्याचे आवाहन केले. यावेळी गुणवंतांना स्वर्गीय श्रीहरी जीवतोडे स्मृतिप्रीत्यर्थ जनता करिअर लॉन्चर तर्फे तर सुलोचना बल्की यांच्या तर्फे स्व. सखाराम रघू बल्की स्मृतिप्रीत्यर्थ पारितोषिक देण्यात आले.

यावेळी दीपक गिरसावळे व महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट कामगार पुरस्कारप्राप्त किसन नागरकर व मारोती पिंपळशेंडे तर गुणवंत शेतकरी हरिश्चंद्र बोढे, गजानन जुनघरी, धोंडीराम पिंपळशेंडे यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्षीय भाषणात ॲड. सातपुते यांनी समाजबांधवांनी मंडळांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. नामदेव मोरे व कवयित्री सविता कोट्टी, प्रास्ताविक सुधाकर जोगी तर आभारप्रदर्शन ॲड. विलास माथनकर यांनी केले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने गुणवंत विद्यार्थी व समाजबांधव उपस्थित होते.

## थोडक्यात

### रस्त्याच्या बाजूने वाहणाऱ्या पाण्यामुळे शेतीचे मोठे नुकसान
### शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०७, लोणार (बुलडाणा) :** लोणार तालुक्यातील सुलतानपुर ते मोप या रस्त्यांचे काम सुरू आहे. परंतु समृद्धी महामार्गाचे वाहते पाणी शेतकऱ्यांच्या शेतात जात असल्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्या बाबत आज दि.७ जुलै रोजी लोणार तहसितदार यांना निवेदन दिले आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ४ ते ५ महिन्यांपासून सुलतानपुर ते मोप या रस्त्यांचे सिमेंट रस्ता रूंदीकरणा चे काम सुरु आहे. परंतु धानोरा जवळ समृद्धी महामार्ग आहे या भागातून पावसाचे मोठ्या प्रमाणात येत आहे असून रस्त्यांवर काही छोटी पुले आहेत. परंतु काहीनी ते पुले बंद केल्यामुळे भानापुर-राजनी व सुलतानपुर भागातील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसत मुळे मोठे प्रमाणात नुकसान झालेले आहे. याबाबत प्रशासनाला वेळोवेळी या अगोदर निवेदन दिले आहे. पण यावर कुठलीच कारवाई झालेली नाही. त्यामुळे संबंधित प्रशासनाने याकडे लक्ष देवून होणारे शेतकरी वर्गाचे नुकसान टाळावे अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आलेली आहे.

या निवेदनावर गजानन धांडे, रामदास बोबडे, नारायण साखरे, वसंता पवार, कैलास पवार, प्रभाकर बोबडे, तुकाराम बोबडे, नारायण अवचार, आत्माराम अवचार, पंजाब बोबडे, बळीराम बोबडे, रामेश्वर साखरे, सुभाष खेत्रे, दत्ता जोगदंड, बंडू बोबडे, मोहन आव्हाळे यांच्यासह इतर शेतकऱ्यांच्या निवेदनावर सह्या केलेल्या आहेत.

### महिला गोविंदा पथकासाठी सराव शिबिर

**अक्षराज : संदिप येवले**



**दि.०७, मुंबई :** उपनगरामध्ये दहीहंडी उत्सव मोठ्या जल्लोष आणि धुमधडाक्यात साजरा होत असतो. या उत्सवात अनेक महिला गोविंदा पथके सहभागी होत असतात. मुलींना कबड्डी व इतर खेळांच्या माध्यमातून सक्षम करून स्वकर्तुत्वावर उभे राहण्यास प्रेरित करणे हा यामागील उद्देश ठेऊन अशा साहसी शिबिराचे आयोजन केले जाते. या पार्श्वभूमीवर भांडुप येथील उत्कर्ष नगर महिला गोविंदा पथक सज्ज झाले असून यशवंत चांदजी स्पोर्ट्स क्लबच्या वतीने दहीहंडी सराव शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १० जुलै गुरुपौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर या सराव शिबिराचा प्रारंभ करण्यात येणार आहे. शिबिराचे हे १० वे वर्ष असून २०० हून अधिक महिलां या शिबिरात सहभागी होत असून सुरक्षेच्या दृष्टीने सर्वांचा विमा काढण्यात येतो.

आजपर्यंत अनेक मानाच्या दहीहंड्या या महिला पथकाकडून फोडण्यात आल्या आहेत. क्लबच्या अध्यक्षा नयना श्याम तावडे यांच्या मार्गदर्शना खाली यशवंत चांदजी विद्यामंदिर या ठिकाणी हे सराव शिबिर घेण्यात येणार आहे. यशवंत चांदजी स्पोर्ट्स क्लबची स्थापना ९ सप्टेंबर १९९५ रोजी, गुरुपौर्णिमेच्या पवित्र दिवशी उत्कर्ष नगर, भांडुप (प.) येथे झाली. गेली ३० वर्षे संस्थेने सामाजिक, सांस्कृतिक व क्रीडाविषयक उपक्रमांद्वारे समाजसेवेचे कार्य केले आहे. त्याचच एक फलित म्हणजे महिला गोविंदा पथकाचा जन्म. या पथकाचे अध्यक्ष मंदार सावंत यांचे नेहमीच सुस्पष्ट मार्गदर्शन आणि पाठबळ लाभले असून, क्लबचा मुख्य उद्देश – मुलींना विविध खेळांमधून सक्षम बनवणे व त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणेहा उद्देश जपला गेला आहे.

### छ.संभाजी महाराज उद्यानाची सुरक्षा भिंत कोसळली

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.०७, नागपूर :** मागील चोवीस तासांपासून संतत मुसळधार पाऊस सुरू असल्याने अनेक ठिकाणी पाणी साचले आहे. मुसळधार पावसामूळे ७ जुलै सोमवारला दुपारच्या सुमारास छत्रपती संभाजी महाराज उद्यानाची सुरक्षा भिंत कोसळली. मात्र, सदर घटनेत सुदैवाने मोठी दुर्घटना टळली. खापरखेडा मुख्य बाजारपेठेत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या जागेवर लहान मोठ्या व्यापाऱ्यांनी अतिक्रमण करून दुकान थाटले आहेत. याच परिसरात वीज केंद्राच्या जागेवर छत्रपती संभाजी महाराज उद्यान आहे या उद्यानाला लागून खापरखेडा औष्णिक वीज केंद्राची सुरक्षा भिंत आहे. मुख्य बाजारपेठेत अतिक्रमणाच्या जागेवर राजेश गजभिये यांचे टेलरचे दुकान आणि देवचंद तांडेकर गोपी बूट हाऊस आहे. सदर दुकानाच्या मागे छत्रपती संभाजी महाराज उद्यानाला लागून असलेली खापरखेडा औष्णिक वीज केंद्राची सुरक्षा भिंत आहे या भिंतीला लागून भले मोठे जुने वृक्ष आहे.

संततधार सुरू असलेल्या मुसळधार पाऊसा मूळे जळापासून वृक्ष सुरक्षा भिंतीवर कोसळले त्यामुळे जवळपास १० ते १५ मीटर सुरक्षा भिंत पडली. सदर घटनेत दुकानाचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झाले नाही. मात्र, दुकानाच्या बाजूला असलेल्या चहाटपरीवर गर्दी होती वृक्ष कोसळ्याची माहिती कळताच काही काळ धावपळ उडाली.

# संपादकीय



## पदव्युत्तर शिक्षणाची तपासणी

नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना महाविद्यालयीन पातळीवर शिक्षणाचा दर्जा अधिक चांगला असावा, यासाठी प्रभावी उपाययोजना कराव्या लागणार आहेत. साहजिकच राज्यभरातील विद्यापीठांमध्ये त्या दृष्टीने कार्यवाही सुरू असेल. त्यात पुढचे पाऊल टाकत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने यंदा पदव्युत्तर महाविद्यालय तपासणी मोहीम हाती घेतली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) नियमांचे आणि निकषांचे पालन, राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेकडून (नॅक) मूल्यांकन आदी निकषांवर ही तपासणी केली जाणार आहे. या मोहिमेच्या अंतर्गत पात्र शिक्षक, प्राचार्य यांची नेमणूक नसलेल्या महाविद्यालयांचा, केवळ परीक्षांपुरत्या चालणाऱ्या पदव्युत्तर महाविद्यालयांचा शोध लागेल आणि चुकीच्या गोष्टींना आळा बसेल, अशी प्राथमिक अपेक्षा आहे. तपासणी अहवालानंतर गुणवत्ता सुधारणेसाठी उपाययोजना कराव्या लागतील.

पूर्वी विद्यापीठातील पदव्युत्तर विभागात प्रवेशासाठी मोठी चुरस असे. पदव्युत्तर शिक्षण व संशोधनासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी होती. कालांतराने पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांचे पेवच फुटले. सहज मिळणारा प्रवेश, मिळणारी वेगवेगळी आश्वासने अशामुळे तिकडे प्रवेशाचा कल वाढला. अर्थात, त्यात काही चांगल्या महाविद्यालयांचाही समावेश होता. निकष, नियमावली डावलणाऱ्या महाविद्यालयांमध्ये प्रवेशाचा ओघ वाढल्याने, विद्यापीठाच्या आवारातील पदव्युत्तर विभागांमधील प्रवेशावरही त्याचा परिणाम झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड व धाराशिव या चार जिल्ह्यांमध्ये पदवीची ४८४ महाविद्यालये आहेत. यात पदव्युत्तर अभ्यासक्रम शिकवणारी तब्बल १९४ महाविद्यालये आहेत. विद्यापीठ प्रशासन आता महाविद्यालयांमधील पायाभूत सुविधा, पात्र शिक्षकांची नेमणूक, शुल्क रचना, अद्ययावत प्रयोगशाळा, ग्रंथालये अशा सहा निकषांवर तपासणी करणार आहे. तपासणी पथकांकडून अहवाल आल्यानंतर संबंधित महाविद्यालयांची प्रवेशक्षमता निश्चित होईल. तोपर्यंत महाविद्यालयांना प्रवेशप्रक्रिया सुरू करता येणार नाही.

पदवी अभ्यासक्रमातील अनेक विषय शिकवण्यासाठी पुरेसे शिक्षक नसताना अनेक ठिकाणी पदव्युत्तर महाविद्यालये सुरू झाली. पाहता पाहता त्यांची संख्या वाढली. मागणी तसा पुरवठा, असा प्रकारही सुरू आहे. मागणी असलेले अभ्यासक्रम सुरू करण्याची स्पर्धाच यातून निर्माण झाली आहे. हे एक प्रकारचे बाजारीकरण असून, त्यातून मोठे अर्थकारण उभे राहिले आहे. काही मोजके विज्ञान शाखेतील विषय चर्चेचे ठरतात. मान्यव्यशाखा, वाणिज्य शाखेतील अनेक अभ्यासक्रम यांनाही मागणी असते. त्यात केवळ 'परीक्षांपुरते प्रवेश' अशा प्रयोगांची सुरुवात झाली. पदव्युत्तर शिक्षणाच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले.

अनेक महाविद्यालयांना पूर्णवेळ प्राचार्य नाहीत. यात एक कारण विद्यापीठाच्या प्रशासकीय दुर्लक्षाचेही म्हटले जाते. मोहिमेच्या निमित्ताने आता प्रशासनाला उशिराने का होईना, जाग आली असे म्हणावे लागेल. राज्यातील इतरही विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर महाविद्यालयांची परिस्थिती फार काही उत्तम असेल, असे नाही. विविध पारंपरिक विद्यापीठांशी संलग्नित अनुदानित पदवी महाविद्यालयांची संख्या सुमारे १२२० आहे. विनाअनुदानित महाविद्यालयांची संख्या तिपटीने आहे. राज्यातील सार्वजनिक विविध विद्यापीठांमध्ये पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पंचवीस लाखांच्या घरात आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने टाकलेले पाऊल लक्षात घेत त्या धर्तीवर राज्यातील सर्व महाविद्यालयांची तपासणी होणे गरजेचे आहे. सर्व महाविद्यालयांची पारदर्शकपणे तपासणी झाली तर उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेला बळकटी देण्यासाठी हे पाऊल महत्त्वपूर्ण ठरेल. महाविद्यालयांची तपासणी करून ते अहवाल सर्वसामान्य जनतेसाठी खुले झाले, तर पदवीसह पदव्युत्तर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या पालकांसाठी संस्था, अभ्यासक्रम निवडणे सोयीचे आणि अधिक सुलभ होईल.

# गुरूंची जीवनातील आवश्यकता

'गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात् परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः ।।

अर्थात गुरु हेच ब्रह्मा, गुरु हेच सर्वव्यापक भगवान विष्णु आणि गुरु हे शंकर आहेत. एवढेच नव्हे, तर ते साक्षात् परब्रह्म आहेत. अशा गुरूंना मी नमस्कार करतो....

हिंदु धर्मशास्त्रामध्ये वरील श्लोक सांगितला आहे. एकदा एका विदेशी व्यक्तीने स्वामी विवेकानंद यांना प्रश्न विचारला, ''भारताचे एका वाक्यात वर्णन करायचे झाल्यास कसे कराल ?'' तेव्हा स्वामी विवेकानंद यांनी सांगितले, ''गुरु-शिष्य परंपरा !'' गुरु-शिष्य अशा सुरेख संगमातून महान राष्ट्राच्या निर्मितीची अनेक उदाहरणे पुराणकाळापासून इतिहासापर्यंत पहायला मिळतात, उदा. श्रीराम आणि वसिष्ठ, पांडव आणि श्रीकृष्ण. चंद्रगुप्त मौर्य याला आर्य चाणक्य यांनी गुरु म्हणून मार्गदर्शन केले आणि एका बलशाली राष्ट्राची उभारणी केली. छत्रपती शिवाजी महाराज यांना समर्थ रामदासस्वामी आणि संत तुकाराम महाराज यांनी मार्गदर्शन केले अन् छत्रपती शिवाजी महाराज यांनी ५



पातशाह्यांना पराभूत करून हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. हे आपले आदर्श आहेत. भारतावर इंग्रजांनी किंवा त्यांच्या आधी मोगलांनी केलेल्या राज्यामध्ये प्रजा कधीही समाधानी नव्हती; कारण ते आसुरी प्रवृत्तीच्या लोकांनी केलेले राज्य होते. चैतन्य वगैरे गोष्टींपासून ते फार लांब होते.

आपण जीवनात शिकत असतांना ज्या ज्या गोष्टींकडून शिकतो, ते आपल्यासाठी गुरुस्वरूपच असतात. त्यामुळे प्रत्येकाला गुरूंची आवश्यकता जीवनात पदोपदी असतेच. या तत्त्वावर विचार करतांना आपल्या लक्षात येते की, गुरु-शिष्य परंपरा हाच महान हिंदु संस्कृतीचा पाया आहे. भारतावर आक्रमण करणार्या प्रत्येक आक्रमणकर्त्याने याच पायावर घाला घातला आणि भारताची आजची स्थिती आपल्या समक्ष आहे. वर्ष १८३५ मध्ये लॉर्ड मेकॉले याने तत्कालीन इंग्रज संसदेत पुढील सूत्र मांडले, ''मी भारताच्या कानाकोपर्यात प्रवास केला. या काळात मी कुठेही दारिद्र्य किंवा चोर पाहिलेले नाहीत. अशी संपन्नता आणि असे वैभव या ठिकाणी आहे. इतकेच नाही, तर येथील लोकांचे उच्च विचार, नीतीमत्ता आणि गुण पहाता 'या लोकांवर आपण शासन करू शकू', असे मला वाटत नाही. या लोकांवर शासन करण्यासाठी आपल्याला त्यांच्या परंपरा, संस्कृती, शास्त्र आणि आध्यात्मिकता यांच्या एकत्वाने बनलेल्या कण्यावर आघात करावा लागेल. यासाठी येथील परंपरागत चालू असलेल्या शिक्षणपद्धतीला (गुरु-शिष्य परंपरेला) पालटावे लागेल. त्यासाठी येथील लोकांच्यात असा समज आणि श्रद्धा निर्माण करावी की, जे इंग्रज आणि विदेशी आहेत, ते भारतियांहून चांगले अन् उच्च आहेत. यातून ते स्वतःचा आत्मसन्मान आणि संस्कृती विसरतील अन् त्यातूनच आपले वर्चस्व आपण त्यांच्यावर अंकित करू शकतो.'' यातून आपल्या लक्षात येते की, इंग्रजांनी स्वार्थापोटी भारताच्या संस्कृतीवर आक्रमण करून तिला नष्ट-भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केला. या दुष्कृत्याचे परिणाम आपण स्वातंत्र्यानंतरही कित्येक दशके भोगत आहोत. देशाच्या स्वातंत्र्योत्तर काळापासून भारताच्या कोणत्याही शासनकर्त्याने देशाला योग्य पद्धतीने चालवण्यासाठी धर्मगुरु किंवा संत यांचे मार्गदर्शन घेतलेले नाही. राजसत्तेवर धर्मसत्तेचा अंकुश नसल्याने स्वैराचारी आणि दुराचारी राजाला शिक्षा देण्याची व्यवस्था नाही. पूर्वीच्या काळी प्रत्येक राजघराण्याचे राजगुरु असत आणि राजा त्यांच्याकडून मार्गदर्शन घेत असे. काही चुकीचे दिसल्यास राजाला त्याविषयी खडसावण्याचे आणि त्याचे दुष्परिणाम लक्षात आणून देण्याचे कार्य राजगुरु करत. अशा प्रकारे राजगुरूंच्या माध्यमातून राजसत्तेला धर्मसत्ता नियंत्रित करत असे.

**- जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क करा. ९६६४५५९७८०**

**(सनातन डॉट ऑर्ग)**

# जातो माघारी पांढरीनाथा...

महाराष्ट्रातूनच नाही तर,संपूर्ण जगभरातून साधारण एक महिन्यापासून विठुरायाचा वारकरी आषाढी वारीच्या निमित्ताने पायी वारीत निघाला होता. सुखदुःखाचा सामना करत,ऊन-वारा पावसाच्या धारा सहन करत विठू नामाचा गजरात तल्लीन होऊन पवित्र भूमी पंढरपूरला पोहोचला.तेथे माय चंद्रभागेमध्ये स्नान केले व कटेवर कर ठेवून उभ्या असलेल्या पांडुरंगाचे गेले कित्येक दिवसापासून दर्शनाची ओढ मनात ठेवून,विठूरायाचे दर्शन घेतले व मन प्रसन्न झाले. जगद्गुरू संत तुकोबाराय सुद्धा विठुरायाच्या दर्शनाचे वर्णन करतांना त्यांच्या अभंगात म्हणतात,तुझ पाहता समोरी ।दृष्टी न फिरे माघारी ।। वरील अभंगाच्या पहिल्या चरणात आदरणीय संत तुकोबाराय म्हणतात, हे विठुराया! तुझे दर्शन झाले. मन अगदी प्रसन्न झाले. तुझे हे गोड गोजरे रूप प्रत्येकांना भक्तीच्या मोहात टाकणारे आहे.तुझ्या या साजऱ्या रूपाच्या दर्शनानंतर दुसरिकडे मन वळतच नाही.हे मन तुला सोडून माघारी जाण्यास नाही म्हणते.केवळ आणि केवळ तुला बघावेसे वाटत तसेच कित्येक दिवसापासून पायी वारी करत येणाऱ्या वारकऱ्यांच्या मनाचीही तीच अवस्था होताना दिसून येते.तोही पायी वारी चालत येऊन केवळ विठुरायाच्या दर्शनासाठी आसुसलेला असतो. त्याचेही परत घराकडे जाण्यास मन धजावत नाही.अभंगाच्या द्वितीय चरणात तुकोबाराय म्हणतात, माझे चित्त तुझ्या पाया । मिठी पडीली पंढरीराया ।।२।। जगद्गुरु संत तुकोबाराय म्हणतात,हे विठुराया!तुझ्या दर्शनाने माझे मन तृप्त झाले आहे.माझे मन तुझ्या चरणाची लीन झाले आहे. तन मन धन मी तुझ्या चरणावर वाहिले आहे.मला बाकी काहीच नको. ही भक्तीची मिठी तुझ्या चरणांशी मारली आहे.तू तर आम्हा लेकरांना हृदयाशी कवटळणारा आहेस.ही प्रेमाने अन भक्ती भावाने मारलेली मिठी कधीच सुटणारी नाहीये. ती आता जन्मोजन्मीसाठी घट्ट होऊन बसली आहे.

तुकोबाराय अभंगाच्या तृतीय चरणात म्हणतात,नवे सरिता निराळे । लवण मेळवितां जळे ।।३।। जगद्गुरु संत तुकोबाराय वरील अभंगात म्हणतात, माझा जीव तुझ्या चरणी अर्पण केला आहे. ज्याप्रमाणे नदी दरी खोऱ्यातून वाहत येऊन समुद्रात विलीन होऊन जाते.ती समुद्रमय होऊन जाते.तशी माझी अवस्था झाली आहे.नदी समुद्राला मिळाली की, समुद्र तिला वेगळा करू शकेल काय?विठुराया! तू मला तुझ्यापासून वेगळा करू नको.पाण्यामध्ये मीठ टाकले तर त्यामध्ये पूर्णपणे विरघळून जाते व ते संपूर्ण जलमय होऊन जाते, तशीच माझी अवस्था झाली आहे.मी पूर्णतःविठ्ठलमय झालो आहे.तुकोबा अभंगाच्या चरणात म्हणतात, तुका म्हणे बळी । जीव दिला पायातळी ।।४।। संत तुकोबाराय अभंगाच्या अंतिम चरणात म्हणतात, हे विठुराया! तुझ्या चरणासी मी एकरूप होऊन कायमचा तुझा झाल्यामुळे, मी स्वतःच तुझ्या चरणाखाली बळी दिला आहे.अशी जड अंतकरणाने तुकोबाची विठुरायाच्या भेटीनंतर अवस्था झाली आहे. विठुराया पासून विलग होण्याचे किंचित ही मन मानायला तयार नाही. त्याचप्रमाणे वारकरी हा वारीमध्ये पूर्णपणे विठूरायाचा सेवेकरी झालेला असतो.विठ्ठलाच्या भक्ती रसात न्हावून निघतो व विठूरायाच्या दिव्य दर्शनाने संसाराचेही भान विसरून जातो.लेकरं बायका पोरं याचे भानच राहत नाही. तो पूर्णतः विठ्ठलमय होतो. जड अंतःकरणाने विठूरायासोबत हितगुज साधतांना म्हणतो, हे विठुराया! किती रे! ही तुझ्या किमया न्यारी. तुझ्या दर्शनासाठी निघालो.भक्ती रसात न्हावून निघालो. पायी वारीत सुखदुःखात तू सदैव पाठीशी उभा राहिला.तुला आम्हां लेकरांची चिंता आहे. तू माझाच नाही तर, समस्त जगाचा पिता आहे. विठूराया! या संसाराच्या माया-मोहा मध्ये अडकलेलो आहे. घरी बायक लेकरं-बाळ व मायबाप आहे.व काळी जमीन माऊली..!या जमीन मायमाऊली मध्ये घाम गाळून, अन्न पिकवून जगाला पोटानं पोटभर खाऊ घालण्यासाठीचं हे अत्यंत पवित्र कार्यकरायचं आहे.विठुराया! तू माझ्या अंतकरणात आहेच.हा संपूर्ण देह तुझा आहे.पण तुझ्या कडून एक आज्ञा हवी आहे,जातो माघारी पंढरीनाथा । तुझे दर्शन झाले आता ।।हे विठुराया ! तुला सोडून जाण्यास मन धजत नाही मात्र, आता माघारी जावे लागेल.अन हो! विठुराया, मी घरी पोहोचल्यावरही तुझाच धावा करत राहील.शेतात जाऊन कष्ट मेहनत करेल. डोलणाऱ्या पिकातही तुलाच शोधीन. संत सावताजी महाराज तेच म्हणतात, कांदा मुळा भाजी । अवघी विठाई माझी ।। म्हणून विठुराया तुझ्या लेकराला आता माघारी जाण्यास आज्ञा द्यावी.तुझे मन भरून दर्शन घेतले.मन तृप्त झाले. वारकरी बांधव अशीच पंढरीहुन माघारी परतण्याची विठूरायाकडून परवानगी घेऊन,परतीच्या वाटेवर निघाले असता,हृदयात मात्र वारीच्या व इतर वारकऱ्यांसोबतच्या आठवणी तथा विठुरायाची मूर्ती कोरून ठेवलेली असते. कन्या सासुरासासी जाये । मागे परतोनी पाहे ।। तीच अवस्था समस्त वारकऱ्यांची होते व प्रत्येक वारकरी जड अंतकरणाने व भरल्या डोळ्याने माघारी निघतात. **राम कृष्ण हरी...!**

**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मो.नं. ९७६३२८२०७७**

## नवा फंडा..

गोड नाव धर्मादाय
स्थापनकरता फंडा
झटपट माया जमा
तेजीत आला फंडा

लोकोपयोगी संस्था
जनता सेवार्थ झेंडा
संस्थासदस्य करावे
रे बड्या बड्या धेंडा

ऋणहितार्थसत्कर्म
जाहीर बांधावे गंडा
भोळ्या दान शूरांना
सहज घालावा गंडा

प्रारंभीनिष्कामसेवा
भरावा विश्वास हंडा
प्रसंगी पदरमोड करे
पायपीट करत हिंडा

गरजूंनासहाय्य करी
प्रदर्शनबाजार मांडा
इन्कमटॅक्स सूट घ्या
फसवण्या हातखंडा

बोलणा-यांचासहज
विकला जातो कोंडा
नवसाले त्वरित पावे
शेंदूरफासलेलाधोंडा

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**
www.kavyakusum.com

अक्षराज
अचूक वेध... अचूक बातमी

# अभिनेते म्हणतात गुटखा खा तर क्रिकेटर म्हणतात जुगार खेळा !




आपल्या देशात जर सर्वाधिक (चाहते) फॅन फॉलोअर्स कोणाचे असतील तर ते चित्रपटात काम करणारे अभिनेते आणि क्रिकेट खेळणाऱ्या क्रिकेट खेळाडूंचे. कारण चित्रपट आणि क्रिकेट हा आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. सिनेमा आणि क्रिकेट शिवाय भारतीयांचे जीवन अपूर्ण आहे. एकप्रकारे सिनेमा आणि क्रिकेट हे भारतीयांचे श्वास आहे असे म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. क्रिकेट तर आपल्याकडे धर्म मानला जातो आणि काही प्रेक्षक चित्रपट अभिनेत्यांना देव मानून त्यांची पूजा करतात. दक्षिणेत तर अनेक अभिनेत्यांची मंदिरे देखील उभारुन त्यांची पूजा केली जाते. भारतीयांच्या दृष्टीने चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर म्हणजे सर्वस्व म्हणूनच त्यांचे लाखो चाहते आपल्या देशात आढळतात.

विशेषतः तरुण वर्ग तर चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांना आपला आयडॉल मानतात. त्यांच्या प्रमाणे दिसायचा, वागायचा, वेशभूषा, केशभूषा करण्याचा प्रयत्न करतात. हे सिलिब्रेटी सांगतील त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न तरुण वर्ग करत असतो त्यामुळे चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांची जबाबदारी आणखी वाढते. जर तरुण वर्ग आपले अनुकरण करत असतील तर आपली वर्तणूक आदर्शवत असली पाहिजे. आपल्या वर्तणुकीतून किंवा आपण करत जाहिरातीतून तरुणांना चांगला संदेश गेला पाहिजे याची दक्षता या सिलिब्रेटींने घ्यायला

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

हवी मात्र अलीकडे पैशासाठी चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर आपली ही जबाबदारी विसरत चालले आहेत. जो तरुण वर्ग आपल्याला फॉलो करतो, आपल्याला आदर्श मानतो त्यांना आपण पैशासाठी काय करायला लावत आहोत याचेही भान या सिलिब्रेटींना राहिले नाही. आता हेच पहा ना ज्या चित्रपट अभिनेत्यांचे अनुकरण करण्याचा प्रयत्न तरुण वर्ग करतो तेच चित्रपट अभिनेते गुटख्याची जाहिरात करून तरुण मुलांना गुटखा खाण्यास सांगत आहेत. शाहरुख खान, अजय देवगण, अक्षय कुमार यासारखे हिंदी चित्रपट सृष्टीतील सुपरस्टार गुटख्याची जाहिरात करतात आणि तरुणांना गुटखा खाण्यास सांगतात. अभिनेते पैशासाठी चुकीची जाहिरात तरुण वर्गाला व्यसनाकडे वळवत आहेत तसेच क्रिकेटरही करत आहेत. वास्तविक क्रिकेटर हे आपल्या देशाचे प्रतिनिधित्व करतात. परदेशात गेल्यावर त्यांना आपल्या देशाचे राजदूत म्हणून ओळखले जाते. तरुण वर्गही क्रिकेट खेळाडूंचे अनुकरण करत असतात. तेच देशाचे राजदूत असलेले क्रिकेट खेळाडू पैशासाठी ऑनलाइन जुगाराची जाहिरात करत आहेत. ऑनलाइन जुगारामुळे तरुण वर्ग जुगारी तर गुटख्यामुळे व्यसनी होत आहे. आजचा तरुण हा उद्याचा नागरिक आहे. देशाचे भवितव्य तरुणांवर अवलंबून आहे हे माहीत असूनही अशाप्रकारची जाहिरात करून तरुण वर्गाला व्यसनी आणि जुगारी बनवण्याचे काम हे सिलिब्रेटी करत आहेत हा एकप्रकारचा देशद्रोहच आहे. चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर पैशासाठी अशाप्रकारचा देशद्रोह करून तरुणांचे आयुष्य उध्वस्त करत असतील तर त्यांना आदर्श का म्हणावे.

अजूनही वेळ गेलेली नाही चित्रपट अभिनेते आणि क्रिकेटर यांनी गुटख्याच्या आणि ऑनलाइन जुगाराची जाहिरात करणे थांबवावी. पैशासाठी आपण तरुण पिढीसमोर कोणता आदर्श ठेवत आहोत याचा विचार या सिलिब्रेटींनी करावा.

तुम्ही देशातील सन्माननीय नागरिक आहात. देशातील लाखो नव्हे तर करोडो नागरिक तुम्हाला आपला आदर्श मानतात त्याला तडा जाईल असे वागू नका. देशासाठी आणि देशातील तरुणांप्रति तुमचीही काही जबाबदारी आहे याचे भान ठेवून गुटख्याच्या आणि ऑनलाइन जुगारच्या जाहिराती बंद करा आणि तरुणांपुढे आदर्श निर्माण करा.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## जि.प. प्रशाला शाळा, वाघोली येथे पारंपरिक वारकरी दिंडी उत्साहात साजरी



**अक्षराज : विकास वाघ**
**दि.०६, धाराशिव :** आषाढी एकादशीच्या पावन निमित्ताने जिल्हा परिषद प्रशाला शाळा, वाघोली येथे भक्तिभावाने पारंपरिक वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांनी विठ्ठल-रखुमाईच्या वेशभूषेत टाळ, मृदंग व अभंगगायनाच्या गजरात उत्साहाने सहभाग घेतला. 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या जयघोषात गावातील रस्त्यांवरून पांडुरंगाच्या पालखीची मिरवणूक काढण्यात आली. विद्यार्थ्यांनी रंगवलेल्या फुलांनी व पताकांनी पालखीची सुंदर सजावट केली होती. ग्रामस्थ व पालकांनीही या भक्तिमय उत्सवात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

मुख्याध्यापक उद्धव माने सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सांगितले की, वारकरी संप्रदायातून मिळणाऱ्या सांस्कृतिक व आध्यात्मिक मूल्यांची ओळख विद्यार्थ्यांना व्हावी, या हेतूने ही दिंडी आयोजित केली आहे.

कार्यक्रमाची सांगता हरिपाठ व अभंग गायनाने झाली. यावेळी माने यु.सी, कवडे एस.एम, एलगुडे एस.एन, धाबेकर आर.एच, शिंदे डी.एस. खडबडे पी.एस, माळी.एस.टी. चव्हाण.पी.आर, पूनम काकडे यांचा समावेश होता. पालकवर्गाने देखील मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याने हा उत्सव संस्मरणीय ठरला.

## शिक्षक समन्वय संघाचे २ दिवस शाळाबंद आंदोलन



**अक्षराज : सुरेश संकपाळ**
**दि.०६, पाटण (सातारा) :** शासनाच्या १४ ऑक्टोबर २०२४ च्या आदेशानुसार विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांना टप्पावाढ मिळावी या मागणीसाठी ५ जूनपासून शिक्षक समन्वय संघाचे मुंबईत आझाद मैदानावर आंदोलन सुरू आहे. सरकार त्याची दखल घेत नसल्याने शिक्षक समन्वय संघाने ८ व ९ जुलै रोजी शाळाबंद आंदोलनाची हाक दिली आहे. सातारा शिक्षक संघाने या आंदोलनास पाठिंबा दिला आहे. शिक्षकांच्या सहनशीलतेचा अंत न पाहता टप्पावाढ देण्याची मागणी व ८ व ९ जुलै रोजी शाळाबंद आंदोलनाचे निवेदन सातारा शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रदीप लोहार व दिनेश मेटकरी आणि सहकारी यांनी सातारा जिल्हा शिक्षणाधिकारी धनंजय चोपडे यांना दिले.

राज्यातील कायम शब्द काढलेल्या सुमारे ४ हजार विनाअनुदानित व अंशत: अनुदानित शाळा वर्ग आणि तुकड्यांवर हजारो शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी गेली २५ वर्षे उपाशीपोटी काम करीत आहेत. १४ ऑक्टोबर २०२४ च्या आदेशानुसार टप्पावाढ मागील वर्षीच मिळायला हवी होती आंदोलन करून शासन निर्णय तर झाला परंतु तो शासन निर्णय अमलात आणण्यासाठी पुन्हा आंदोलन करावे लागत आहे यासारखे दुर्दैव नाही. केलेले कायदे पाळायला सरकार तयार नाही, याचे शल्य वाटते असे मत प्रदीप लोहार यांनी व्यक्त केले. टप्पा अनुदान वाढीसाठी शेकडो आंदोलने झाली आहेत.परंतु सरकारने फक्त जबाबदारी ढकलण्याचे काम केले. यामुळे शिक्षक समन्वय संघाने दोन दिवसीय शाळाबंद आंदोलनाची हाक दिली आहे. सर्व शिक्षक संघटनानी या आंदोलनास पाठिंबा दिला आहे. तसेच टप्पावाढ न दिल्यास बेमुदत शाळाबंद आंदोलनाचा इशारा दिला आहे.

## जिनियस इंग्लिश स्कूलचे वारकरी दिंडी उत्साहात संपन्न



**अक्षराज : राहुल शिंदे**
**दि.०६, पेठवडगाव :** आषाढी एकादशीच्या पवित्र दिवशी जीनियस इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक रिंगण सोहळ्याचे वडगाव येथे आयोजन करून पंढरपूर वारीच्या वारकरी परंपरेला जागृत ठेवले. नगरपालिका चौकामध्ये सोहळ्याला सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी टाळ मृदुंगाच्या गजरात व विठ्ठल विठ्ठलच्या जयघोषणा देत सहभाग नोंदवला. वारीच्या वेशभूषा सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी वारकरी परंपरेचे सजीव दर्शन घडवले. जीनियस इंग्लिश मीडियम स्कूल चे संस्थापक महेश पोळ व प्रिन्सिपल अर्पणा पोळ यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षकांच्या सहकार्याने संपूर्ण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात गर्जना, अभंग, गायन आणि फुगडी खेळ यांचा समावेश होता. तर काही विद्यार्थ्यांनी संत तुकाराम संत ज्ञानेश्वर संत नामदेव यांच्या वेशभूषा परिधान करून देखील आकर्षण वाढवले.

## विठ्ठल नामाच्या गजरात विजयमाला पौळ यांना अन्नदाता पुरस्कार प्रदान



**अक्षराज : राजेश पुरी**
**दि.०७, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुका पत्रकार संघाच्या वतीने दिला जाणारा विठ्ठल रुक्मिणी अन्नदाता पुरस्कार येथील अन्नदाते श्रीमती विजयमाला पौळ यांना विठ्ठल नामाच्या गजरात प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे हे १५ वे वर्ष आहे. प्रतिवर्षी प्रमाणे या ही वर्षी कळंब तालुका पत्रकार पत्रकार संघाच्या वतीने गेल्या १५ वर्षापासून अन्नदान करणाऱ्या विजयमाला पौळ यांना विठ्ठल रुक्मिणी अन्नदाता पुरस्कार ने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी पत्रकार संघाचे अध्यक्ष अशोक शिंदे हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर, नगराध्यक्ष संजय मुंदडा, ह. भ. प. महादेव महाराज अडसूळ, बाळासाहेब कथले, संदीप बावीकर, निलेश होनराव, संजय घुले, दत्ता तनपुरे, उदय खंडागळे, बाळासाहेब जाधवर, ज्योती सपाटे, अतुल गायकवाड, यश सुराणा, सुमित बलदोटा, आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधवसिंह राजपूत यांनी तर प्रास्ताविक शितलकुमार घोंगडे यांनी केले तर आभार सतीश टोणगे यांनी मानले. या वेळी बालाजी अडसूळ, ज्ञानेश्वर पतंगे, ओंकार कुलकर्णी, संदीप कोकाटे, परवेज मुल्ला, अनिल गाडे, चेतन कात्रे, अमर चोंदे, आदी उपस्थित होते.

## जानवळे ओझरवाडीत बांधण्यात आलेल्या नवीन साकवाचा फायदा गावच्या पुढील वाडीतील ग्रामस्थांना होणार का?




**अक्षराज : उदय दणदणे**
**दि.०७, गुहागर :** गुहागर तालुक्यातील जानवळे ओझरवाडी येथे नविन साकव संदर्भात मनसेच्या वतीने दिनांक ०४ जुलै २०२५ रोजी उपजिल्हाध्यक्ष विनोद जानवळकर यांनी जिल्हाधिकारी, रत्नागिरी यांना निवेदन सादर केले आहे. सदर निवेदनाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी, सचिव जिल्हा नियोजन समिती रत्नागिरी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी जिल्हा परिषद रत्नागिरी यांना देण्यात आले आहे. दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की,

गुहागर तालुक्यातील जानवळे गावातील ओझरवाडी येथे साकव बांधण्यात आला आहे. या साकवाचा फायदा गावातील पुढील वाडीतील ग्रामस्थांना होणार आहे का..? याची चौकशी करण्यात यावी.तसेच साकवापर्यंत जाणा-या रस्त्याची किंवा पायवाटेची कुठेही शासकीय दप्तरी २३ नंबरला नोंद नाही. ग्रा.पं. जानवळे यांनी कुठल्याही मागणीचे पत्र किंवा प्रस्ताव पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद कार्यालयाकडे सादर करण्यात आलेला नाही. परंतु या साकवापलीकडे लोकवस्ती आहे परंतु तेथील पुढील रस्ता बंद आहे तरी यांची आपल्या कार्यालय कडून योग्य ती चौकशी करण्यात यावी.

मुख्य रस्ता जानवळे हेमंत हॉटेल ते साईबाबा मंदिर मार्ग शेजारी ओझरवाडी येथे जाण्या-येण्यासाठी व वाहतुकीसाठी साकव पलीकडून कुठपर्यंत जाणार आहे. या साकवाचा सर्वसामान्य जनतेला उपयोग होणार आहे का..?

महसूल विभागामार्फत जो गट नंबर २४८ बिनशेती करण्यात येतो, त्याच्या जागेमधून वाट देणे बंधनकारक असते तरी सदर लाभार्थी इतर लोकांना जागा देत नाही, नवीन शासन निर्णयाप्रमाणे पुढील घरासाठी किंवा वाडीतील लोकांसाठी जागा देणे बंधनकारक असताना पण त्यांना पायवाट/जागा दिली जात नाही. वरिल विषयांची चौकशी करण्यात येऊन आपल्या लेखी अभिप्राय कळविण्यात यावा हिच अपेक्षा शेवटी विनोद जानवळकर यांनी निवेदनाद्वारे व्यक्त केली आहे.

## हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक महाबळेश्वर येथील मोहरम उत्साहात साजरा...



**अक्षराज : रियाज मुजावर**
**दि.०६, महाबळेश्वर (सातारा) :** इस्लामिक नव वर्षाचा प्रारंभ मोहरम महिन्या पासून होतो. तसेच हजरत पैगंबर मोंहमद यांचे नातू हसन, हुसेन हे दोघेही या महिन्याच्या १० तारखेला करबला येथे शहीद झाले होते. मोहरमच्या ५ तारखेला पंज्याची स्थापना केली जाते.

अनेक वर्षापासून महाबळेश्वर येथे आसिफ भाई शेख यांचे येथे इमामे कासिम व भरत भोसले यांच्या येथे १२ इमाम पंजे बसवतात व मनोभावे सेवा करतात. येथे हिंदू मुस्लिम बांधव दर्शन घेऊन प्रार्थना करतात. महाबळेश्वर येथे नायब तहसिलदार दिपक सोनावले, जाहिदा शेख, विनोद सावंत उपपोलिस निरक्षक रउफ इनामदार, आबा ढोबळे, माजी नगरसेवक प्रकाश पाटील इत्यादींनी दर्शन घेतले. तसेच तौफीक पटवेकर यांनी मोहरम विषयी माहिती दिली व मान्यवरांचे स्वागत तसेच सूत्रसंचलन केले.

मोहरम कमेटीच्या वतीने मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी असिफ शेख, भरत भोसले, मंजुर शेख, परवेज शेख, मुन्नाभाई पटेल, जावेद शेख, मोहन कांबळे आयाज खाटीक, एजाज शेख, बाबा फरीद, सईद पटवेकर, मलिक शेख, पत्रकार बांधव व इतर मान्यवर उपस्थित होते.

## वाई तालुक्यात बिबट्याचा धुमाकूळ 3 शेळ्या ठार



**अक्षराज : दिलीप कांबळे**
**दि.०६, वाई (सातारा) :** तालुक्यातील दुर्गम डोंगराळ विठ्ठलवाडी कुसगाव येथे शनिवारी बिबट्याने वस्तीत घुसून गोठ्यात बांधलेल्या ३ शेळ्या ठार केल्या. येथील शेतकरी संपत गणपत गोळे यांच्या घराशेजारील गोठ्यात बांधलेल्या ३ शेळ्यावर बिबट्याने हल्ला करून ठार मारल्या. यापूर्वी भगवान सखाराम पाटणे, बाळू गोळे, दत्तात्रय निकम व नवनाथ पाटणे यांच्या शेळ्या व पाळलेले कुत्रे ठार केले होते. या घटनेची माहिती वनविभागाला कळवली असता खात्याने फारशी दखल घेतली नव्हती. वाई तालुक्याच्या पश्चिम जोर जांभळी खोरे हे घनदाट झाडी व डोंगराळ भाग असल्याने बिबट्याला लपण्यासाठी सुरक्षित जागा आहे. त्यामुळे या परिसरात बिबट्याचा वावर व हल्ले वाढली आहेत. याआधी बोरगाव येथील वस्तीत घुसून दारात बांधलेल्या कुत्र्यावर हल्ला करून त्याला ठार मारले होते. नागेवाडी येथील शेतकरी गुरे चारण्यास रानात गेले असता, बरोबर असलेल्या २ कुत्र्यांचा फडशा बिबट्याने पाडला होता. बिबट्याचे लक्ष शेळ्या मेंढ्या व कुत्र्यावर असून अशा प्राण्यांच्या शोधात बिबट्या नागरी वस्तीपर्यंत येतो, भागातील मांढरदेव घाट भोर घाट वेरूळी जोर खोऱ्यातील व जांभळी खोऱ्यातील गावातील रहिवाशांना बिबट्याचे दर्शन घडते असे नागरिक तातडीने वनविभागाला कळवतात. मात्र वन खात्याकडून फारशी दखल घेतली जात नाही अशा ग्रामस्थांच्या तक्रारी आहेत. बिबट्याच्या भीतीने गुराखीव शेतात कामासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने घटनास्थळी जाऊन त्या परिसरातील ग्रामस्थांच्या सुरक्षेच्या दृष्टीने मार्गदर्शन करून ठोस पावले उचलावी व नुकसानग्रस्तांना तातडीने मदत द्यावी अशी मागणी जनतेतून होत आहे.

## आज कासारवडवली उड्डाणपूलाचं होणार लोकार्पण



**अक्षराज : प्रतिनिधी**
**दि.७, ठाणे :** दिवसेंदिवस वाहतूक कोंडी मोठी समस्या होत आहे. शहरातील वाढत जाणाऱ्या या समस्येचा त्रास नागरिकांना मोठ्या प्रमाणात सहन करावा लागत आहे. याचपार्श्वभूमीवर आता ठाणेकरांसाठी एक आनंदाची बातमी आहे. ठाणे जिल्ह्यातील महत्वाच्या वाहतूक प्रकल्पांपैकी एक असलेला कासार वडवली उड्डाणपूल प्रकल्पाचा पहिला टप्पा आता अंतिम टप्यात असून आज पासून (८ जुलै) हा पुल वाहतुकीसाठी खुला होणार आहे. अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले की, कासारवडवली उड्डाणपुलाच्या पहिल्या टप्प्यात डाव्या बाजूची मार्गिका आज पासून (८ जुलै) वाहतुकीसाठी खुली होणार असून या उड्डाणपूला वर ३०० मीमी जाडीचा एम-४० ग्रेड सिमेंट काँक्रीटी थर असून मध्यभागी असलेल्या भूयारी मार्गाच्या पृष्ठभागावर मॅट्रेसचा थर पसरवून सदर पुलाचे भक्कम बांधकाम करण्यात आले आहे.

या उड्डाणपुलाच्या निर्मितीमुळे ठाणे, मुंबई आणि नवी मुंबई तसेच जेएनपीटी, बोरीवली, वसई, विरार आणि गुजरातकडे जाणाऱ्या अवजड वाहनांसाठी उत्तम कनेक्टिव्हिटी मिळणार आहे. तसेच गुजरात ते जेएनपीटी दरम्यानच्या वाहतुकीस अडथळा न होता सुलभ मार्ग उपलब्ध होणार. या बरोबरच वाशी ते ठाणे, नवी मुंबई कार्यालयात जाणाऱ्या वाहनांसाठी भुयारी मार्गाच्या निर्मितीमुळे गायमुख ते वाघबिळ या मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होणार आहे, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. दरम्यान विधिमंडळाचे अधिवेशन चालू असल्याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे कामकाजात व्यस्त आहेत, त्यांच्याच सूचनेनुसार आज म्हणजे मंगळवार दि.८ जुलै रोजी दुपारी २ वाजता या कासारवडवली उड्डाणपूलाच्या उजव्यामार्गिकेचे लोकार्पण परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या शुभहस्ते होत आहे. यावेळी बोलताना मंत्री सरनाईक म्हणाले की लोकप्रतिनिधी या नात्याने कासारवडवली, गायमुख, घोडबंदर या भागात उड्डाणपुल व्हावे ही मागणी मी स्वतः केली होती. त्यानुसार तत्कालीन मुख्यमंत्री व मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष एकनाथ शिंदे यांनी या प्रकल्पला मंजुरी होती. तथापि या प्रकल्पाच्या पूर्णत्वामुळे घोडबंदर मार्गावरील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल!

घोडबंदर मार्गावरील तीव्र वाहतूक भार लक्षात घेता उड्डाणपूल दोन टप्प्यांमध्ये बांधण्यात येत आहे.पहिला टप्प्यात डावीकडील बाजू (ठाण्याकडून गाईमुखकडे) पूर्ण झाली असून आज पासून वाहतुकीसाठी खुला होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात उजवीकडील बाजूची (गायमुखकडून ठाणेकडे) पावसाळ्यानंतर स्थापत्य कामे हाती घेण्यात येणार आहेत.

